**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

Estd : 1962
NAAC 'A++' Grade
Accereditted by NAAAC (2021)
With CGPA3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ दि. 14 JUN 2022

№ 00478

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक,**

**सर्व संलग्नीत महाविद्यालये,**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय:-** उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

**संदर्भ:-** जा.क्र.:१७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/७५ दि. ०८/०६/२०२२ रोजीचे मा. तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून **सन २०२२-२३ करिता खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.**

तरी सोबत जोडलेले संदर्भांकित पत्र अवलोकनी घेवून **विहित कालमर्यादेत** विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून त्वरीत करावी.

आदेशान्वये

**श्री. विलास एस. सोयम**
**उपकुलसचिव**
**संलग्नता टी-२ विभाग**

**सोबत- वरीलप्रमाणे**

**संदर्भ क्र. संलग्नता टी-२/**

H:\january 2022\Circular 2019 (Repaired).docx

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

pvc office <pvcoffice@unishivaji.ac.in>

# Fwd: उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन 2022-23 करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

1 message

**Registrar Shivaji University, Kolhapur** <registrar@unishivaji.ac.in> Thu, Jun 9, 2022 at 10:30 AM
To: pvc office <pvcoffice@unishivaji.ac.in>, pgadmission section <pgadmission@unishivaji.ac.in>, "Affiliation Unit 1 Shivaji University, Kolhapur" <affiliationt1@unishivaji.ac.in>, DSW Department <dsw@unishivaji.ac.in>

---------- Forwarded message ---------
From: **DTE Maharashtra** <desk17@dtemaharashtra.gov.in>
Date: Thu, Jun 9, 2022 at 10:24 AM
Subject: उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन 2022-23 करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...
To: <vice-chancellor@mu.ac.in>, <registrar@sndt.ac.in>, <regis@unipune.ac.in>, **registrar** <registrar@dbatu.ac.in>, **registrar** <registrar@unishivaji.ac.in>, **registrar** <registrar@bamu.ac.in>, <registrar@nmu.ac.in>, <registrar@srtmun.ac.in>, **reg** <reg@sgbau.ac.in>, **registrar** <registrar@nagpuruniversity.nic.in>, Registrar . <registrar@sus.ac.in>, <registrar.gondwanauniversity@gmail.com>, <gug.registrar@gmail.com>, <registrar@mu.ac.in>, <registrar@ictmumbai.edu.in>
Cc: Dhanapal Kamble <dhanapal.kamble@dtemaharashtra.gov.in>, Aashish Nikarm <aashish.nikam@dtemaharashtra.gov.in>

Shivaji University, Kolhapur
Pro-Vice-Chancellor Office
Date :- 9 JUN 2022
Inward No :- 144
To Whom : Aff-T-2

महोदय

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजनेंतर्गत शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष 2022-23 करीता **https://foreignscholarship2022.dte.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज मागविण्यात आले असून, सदर योजनेच्या माहितीचे पत्र सोबत जोडले आहे.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे कळवून सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत अवगत करण्यांत यावे ही विनंती.

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-
Inward No. 4389
Date 10/06/2022

(1) Aff. T-2
(2) P.G. Admission

का.क्र.17

854 10/6/22

तंत्र शिक्षण संचालनालय, मु.का., मुंबई

10/6 9/6/2022 9/6

*This email and any files transmitted with it are confidential and intended solely for the use of the individual or entity to whom they are addressed. If you have received this email in error please notify the system manager. Please note that any views or opinions presented in this email are solely those of the author and do not necessarily represent those of the Shivaji University. Finally, the recipient should check this email and any attachments for the presence of viruses. Shivaji University accepts no liability for any damage caused by any virus transmitted by this email.*

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/७५ दिनांक : 8 JUN 2022

प्रति,
मा. कुलगुरु,
१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२) मुंबई विद्यापीठ, मुंबई
३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
१०) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
११) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
१३) रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई

**विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्रक्र.२१८/तांशि-४, दि. ४ ऑक्टोबर, २०१८
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दि. ६ सप्टेंबर, २०२१

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यांत आली असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतील अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

त्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची

प्रक्रीया संचालनालयाच्या https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यांत आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत :

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२२ मधील) THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२१-२२ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **https://foreignscholarship2022.dte.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेला शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ चा शासन निर्णय तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुध्दीपत्रके पहावीत व त्याअनुषंगाने अर्जांची छाननी करण्यांत येईल.

सदर शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील "अ" दर्जाच्या वर्तमानपत्रातील सर्व आवृत्यांमध्ये जाहिरातही प्रसिध्द करण्यात येऊन, सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यांत आले आहेत.

इच्छुक उमेदवारांनी **https://foreignscholarship2022.dte.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक ८ जुलै, २०२२ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात दिनांक १०जुन, २०२२ ते ११ जुलै, २०२२ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यांत येत आहे.

१) सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.

२) आपल्या विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.

३) कॅम्पस रेडिओ, विद्यापीठाचे न्युज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची माहिती व जाहिरात यास प्रसिध्दी द्यावी.

४) आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यांत याव्यात.

५) सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्यूब, इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.

६) सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत अवगत करण्यांत यावे.

आपला

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना माहिती साठी सविनय सादर.